विषय:- देवळे, मशीदी, चर्च, इत्यादी धार्मिक स्वरूपाच्या बांधकामासाठी जमीनी देणे व अकृषिक परवानगी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
परिपत्रक क्रमांक:एनएपी १०८५/१०५७८३ [९११]-ल-२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: 14 OCT 1985 ऑक्टोबर, १९८५.

वाचावे:- १] शासन परिपत्रक नि. म. वि. क्र. २५६/३९, दि. १७-५-१९४६
२] शासन परिपत्रक शा. म. वि. क्र. २५६/३९, दि. १६-९-१९४७
३] शासन परिपत्रक म. वि. क्र. ४६८४/४९, दि. २९/९/१९५०.

देवळे, मशीदी, चर्च किंवा इतर धार्मिक प्रयोजनासाठी सरकारी जमीन देण्यापूर्वी, तसेच भोगवटयाखाली असलेल्या जमिनीत अशा बांधकामासाठी जमिनीच्या वापरात बदल करण्याकरीता परवानगी देण्यापूर्वी राज्यशासनाच्या पूर्व-मंजुरीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत असे स्थायी आदेश आहेत. तथापि, शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की काही जिल्हाधिकारी जिल्हादंडाधिकारी या नात्याने अशा बांधकामाबाबतचे प्रस्ताव परस्पर गृह विभागाकडे पाठवतात. वस्तुत: उक्त प्रयोजनासाठी सरकारी जमीन देणे अथवा भोगवटयाखालील जमिनीच्या वापरात बदल करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ४४ अन्वये अकृषिक परवानगी देणे ही बाब महसूल व वन विभागाच्या अखत्यारीतील आहे.

२. तेव्हा, वर उल्लेखिलेल्या शासकीय आदेशांकडे सर्व जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून त्यांना याव्दारे अशा सूचना देण्यात येत आहेत की देवळे, मशीदी, चर्च इत्यादी धार्मिक स्वरूपाच्या बांधकामासाठी महाराष्ट्र जमीन महसूल [सरकारी जमिनीची विल्हेवाट] नियम १९७१ च्या नियम ४० प्रमाणे जमीन देण्यापूर्वी अथवा अकृषिक परवानगी देण्यापूर्वी त्यांचे प्रस्ताव परस्पर गृह विभागाकडे न पाठविता ते संबंधित विभागीय आयुक्तांच्या मार्फत महसूल व वन विभागाकडे पाठवावेत. असे प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यापूर्वी संबंधित पोलिस अधिकाऱ्यांचे तसेच इतर संबंधित सक्षम अधिकाऱ्यांचे अभिप्राय प्रथम घेतलेले असावेत. प्रशासकीय विभाग म्हणून महसूल व वन विभाग अशी प्रकरणे मंत्रालय पातळीवर संबंधित

विभागांशी विचार विनिमय करून निकालात काढील. सर्व
जिल्हाधिकाऱ्यांनी या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

रा.आ. भिवंडीकर

कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.